# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

## व

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

यांच्या

संयुक्त विद्यमाने आयोजित

# इतिहासाच्या अभ्यासक्रमाची कार्यशाळा

२१ जानेवारी २०१२, शनिवार

# अहवाल


प्रा. विजय पांडे

इतिहास विभागप्रमुख

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार भारतातील बहुतांश विद्यापीठांनी नवीन अभ्यासक्रम स्विकारून ते लागू केले. त्याचाच एक भाग म्हणून डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठानेही इतिहास विषयाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून २००९-२०१० या शैक्षणिक वर्षापासून सदरील अभ्यासक्रम लागू केले. तसेच याच वर्षी प्रथम वर्षास सत्र पध्दतीचाही स्विकार करण्यात आला.

२०११-१२ या शैक्षणिक वर्षापासून बी. ए. तृतीय वर्षाच्या अभ्यासक्रमात बदल करण्यात आला. यामध्ये हा नवीन पेपर पाचव्या सत्रासाठी लागू करण्यात आला. हा अभ्यासक्रम २०१० मध्ये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याने आमच्या महाविद्यालयाने जानेवारी २०१० मध्येच कार्यशाळा घेण्यासंबंधीचा प्रस्ताव महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या संचालकाकडे पाठवला. परंतु विद्यापीठातील अभ्यास मंडळाची मुदत संपलेली असल्याने व नवीन अभ्यास मंडळ अस्तित्वात न आल्यामुळे सदरील कार्यशाळा मंजूर होण्यास बराच कालावधी लागला. परिणामी जूनमध्ये म्हणजेच सत्र सुरू होतांनाच या पेपरची कार्यशाळा घेता आली नाही.

२८ सप्टेंबर २०११ रोजी अभ्यास मंडळाच्या बैठकीत कार्यशाळा मंजूर करण्यात आली. सदरील मंजूरीचे पत्र ११ नोहेंबर २०११ रोजी प्राप्त झाले. कार्यशाळेचा कालावधी निश्चित झाल्यानंतर वक्ते, प्रमुख अतिथी, अध्यक्ष, उद्घाटक, समन्वयक यांच्याशी प्रत्यक्ष व दूरध्वनीद्वारे संपर्क करण्यात आला. २१ जानेवारी २०१२ ही नियोजित तारीख निश्चित करण्यात आली. जानेवारीच्या पहिल्या आठवडयात विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालयामधील इतिहासाच्या प्राध्यापकांना कार्यशाळेचे पत्र पाठविण्यात आले तसेच दूरध्वनी व संदेश याद्वारेही संपर्क

करण्यात आला. अध्यक्ष, उद्घाटक, समन्वयक यांच्याशीही पत्रव्यवहार करण्यात आला.

## उद्घाटन समारंभ :

दि. २१ जानेवारी २०१२ रोजी सकाळी १०:३० वाजता प्रत्यक्ष कार्यक्रमाची सुरूवात झाली. “चराचरांच्या सर्व शक्तींना वंदन” करणारी प्रार्थना म्हणून सुविचार, अमृतवचन सांगण्यात आले. दीपप्रज्वलन करण्यात आले. आलेल्या पाहुण्यांचे परिचय व स्वागत पुष्प, ग्रामगीता देवून करण्यात आले.

सामाजिकशास्त्राचे अधिष्ठाता डॉ. विलास खंदारे यांनी अभ्यासक्रमात इतिहास विषयाचं विश्व निर्माण केलं जातं व त्या विश्वात आपण राहतो. त्यामुळे विश्वाबरोबर नाते जोडण्यासाठी अभ्यासक्रमांची पुनर्रचना व्हायला पाहिजे. तसेच पुनर्रचित अभ्यास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, असा विचार व्यक्त केला. प्रमुख पाहुणे म्हणून विचार मांडताना विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे विभागप्रमुख डॉ. पी. ए. गवळी यांनी इतिहास म्हणजे बदल. इतिहास म्हणजे भूतकाळ व वर्तमान यांचा सुसंवाद होय. वर्तमानकाळातील विद्यार्थ्यांनी इतिहासाच्या विविध अंगांचा अभ्यास केल्याशिवाय विद्यार्थ्यांना या विषयाचे आकलन होणार नाही असा विचार मांडला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे सचिव डॉ सर्जेराव ठोंबरे यांनी विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयाचा इतिहास विभाग हा ज्ञान व संस्कृतीचा ठेवा निर्माण करणारा विभाग व्हावा तसेच त्यांनी छोटेखानी संग्रहालय ही निर्माण करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

## पहिले सत्र :

कार्यशाळेच्या पहिल्या सत्राचे पुष्प महाराष्ट्र शासनाच्या पुरातत्व विभागाचे सहसंचालक डॉ.राहूल भोसले यांनी गुंफले. त्यांनी **पुरातत्वशास्त्र** या विषयावर आपले विचार व्यक्त केले. प्राचीन कालखंड समजण्यासाठी पुरातत्वशास्त्र अतिशय मोलाची भुमिका बजावते. तसेच या शास्त्राला इतर शास्त्रांच्या मदतीने अनेक बाबींवर प्रकाश टाकता येतो. पुरातत्वशास्त्रासाठी खापरे ही मुळाक्षरांप्रमाणे काम करतात. खापरांमुळे सामान्य माणसांचे जीवन उलगडता येते. तसेच प्राचीन टेकाडेंही मानवाच्या विविधांगी जीवनावर प्रकाश टाकतात. उत्खननाचे अनेक तंत्र व प्रकार आहेत. उत्खनन करतांना वेळ, पैसा प्रचंड लागतो, तसेच मनुष्यबळही फार लागते. भारतात उत्खननाची सुरूवात ब्रिटीशांनंतरच झालेली दिसते, असे मत मांडले. या सत्राचे समन्वयक म्हणून चिश्तिया महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. हरी जमाले यांनी काम पाहिले. सत्राचे सुत्रसंचलन प्रा. सुरेश मुंढे यांनी तर आभार प्रा. डॉ अश्विन रांजणीकर यांनी मानले.

**सत्र दुसरे :**

दुसऱ्या सत्रात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वस्तुसंग्रहालयाच्या अधिक्षक निलांबरी जगताप यांनी **'संग्रहालयशास्त्र'** विषयावर मार्गदर्शन केले. संग्रहालयामध्ये नियोजन ही बाब महत्त्वाची असत. संग्रहालयामध्ये काय आहे यापेक्षा ते कसे मांडले याला अतिशय महत्व असते. संग्रहालयामध्ये वस्तूंचे वर्गीकरण, विश्लेषण, नोंदी, मांडणी यावर लक्ष द्यावे लागते. परंतु त्याचबरोबर वस्तुसंग्रहालये ही जनप्रबोधनाची साधने झाली पाहिजे ही अपेक्षा पूर्ण होतांना दिसत नाही. लोकांकडे खाजगी स्वरूपात असलेल्या वस्तू, कागदपत्रे वस्तूसंग्रहालयाकडे सहजा सहजी हस्तांतरीत होतांना दिसत नाहीत,

असा खेद व्यक्त केला. सुत्रसंचलन कचरू गरसोळे यांनी तर आभार मनोज गाडेकर यांनी मानले.

## सत्र तिसरे व समारोप :

कार्यशाळेच्या तिसऱ्या व समारोप सत्रात डॉ. राजेश रगडे यांनी **पर्यटनशास्त्र** या विषयावर व्याख्यान दिले. मराठवाडा हा इतिहासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असून प्राचीन कालखंडात सातवाहनांची राजधानी येथेच होती, यादवांचीही राजधानी येथेच होती. उत्तरेचं पहिले आक्रमणही मराठवाडयावरच झाले. अजिंठा-वेरूळ सारखी शिल्पेही येथेच निर्माण झाली. तसेच ही संताची भूमी म्हणून पर्यटनाच्या दृष्टीने अतिशय महत्वपूर्ण विभाग म्हणून मराठवाडयाकडे पाहिले जाते. महाराष्ट्राची पर्यटनराजधानी म्हणूनही औरंगाबादचीच निवड झालेली आहे. त्यामूळे पर्यटन क्षेत्राला येथे वाव आहे. फक्त इंग्रजी भाषेचे ज्ञान इतिहासाच्या विद्यार्थ्यांना हवे, असा विचार मांडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाच्या अध्यक्षा डॉ. दीपा सावळे हया होत्या. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांची होती. सुत्रसंचलन डॉ. अश्विन रांजणीकर यांनी तर आभार प्रा. विजय पांडे यांनी मानले.

प्रा. विजय पांडे

इतिहास विभाग प्रमुख